**आयुक्त, कुटुंब कल्याण व**
**संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान**
सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

दुरध्वनी - ०२२ - २२६४००६३/६५
०२२ - २२७१ ७५००
फॅक्स - ०२२ - २२६४२२५५
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

'आरोग्य भवन', ३रा मजला,
सेंट जॉर्ज रुग्णालय आवार,
पी. डिमेलो रोड, सीएसटी जवळ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१. ५३/०७ - ०२७

संदर्भिय पत्राच्या सुधारित तारखेसह.

राआसोम/एस-३२/बीएफओ-०६/ /२०१६-१७
दि. ०६.१०.२०१६.

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व)

**विषयः जिल्हा परिषद अंतर्गत सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरील लिपीक संवर्गाने राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत योजनांची कामे करणेबाबत.**

संदर्भः- ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे पत्र क्र. संकीर्ण - ५०१६/ प्र.क्र.४६७/ आस्था-९, दि. १७.९.२०१६.

राज्यांतील काही जिल्हा परिषदांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील कार्यरत कनिष्ठ सहाय्यक/ लिपिक वर्गाने राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत योजनांची कामे करण्यास नकार दर्शविला होता. त्यास अनुसरून महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद लिपीक वर्गीय कर्मचारी संघटना यांनी लिपीक हा ग्रामविकास विभागांतर्गत जिल्हा परिषदेमध्ये काम करत असल्याने याबाबत ग्रामविकास विभागाचा स्पष्ट निर्णय होत नाही, तोपर्यंत लिपीक वर्ग अभियान अंतर्गत कामकाज करणार नाहीत असे दि. ०१.०८.२०१६ रोजीच्या पत्रान्वये संचालक, आरोग्य सेवा यांना कळविले होते.

त्यास अनुसरून ग्रामविकास व जलसंधारण विभागाने उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये सर्व जिल्हा परिषदांमधील प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरीय लिपीक वर्गीय कर्मचा-यांनी अभियानाचे कामकाज नाकारणे गैर शिस्तीचे असून अभियानांतर्गत सर्व योजनांचे कामकाज पुर्वीप्रमाणेच करण्याबाबत आपल्या स्तरावरून सुचना देण्यात याव्यात असे निर्देश दिले आहेत.

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, प्राथमिक आरोग्य केंद्र ही गाव पातळीवरील सेवा देणारी आरोग्य संस्था असून त्यासाठी या स्तरावर मोठया प्रमाणावर निधी वितरीत केला जातो. अर्थातच या निधीचे अभिलेखे ठेवणे बंधनकारक आहे. त्यामुळे जिल्हा परिषदे अंतर्गत सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरीय लिपीक वर्गीय कर्मचा-यांनी राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे कामकाज पुर्वीप्रमाणेच विना मेहनताना करण्याबाबत व लेखा परिक्षणा दरम्यान लेखा परिक्षकांस आवश्यक ते सहकार्य करणेबाबत आपल्या स्तरावरून सक्त सुचना द्याव्यात. जेणेकरून गाव पातळीवरील रुग्ण सेवा सुरळीत चालू राहिल ही विनंती.

संचालक (वित्त व लेखा)
राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र, मुंबई

सोबतः संदर्भिय पत्राची प्रत.

कृ.मा.प.

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीस्तवः-

१. उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळ (सर्व)
२. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. (सर्व)
३. परिमंडळ कार्यक्रम व्यवस्थापक, उपसंचालक कार्यालय (सर्व)
४. जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक (सर्व)
५. जिल्हा लेखा व्यवस्थापक (सर्व)

महाराष्ट्र शासन

Website- http://ruraldev.maharashtra.gov.in
Email:-doadmin 9.rdd@maharashtra.gov.in
दुरध्वनी क्रमांक:-२२०१६७९५

क्र.संकीर्ण-५०१६/प्र.क्र.४६५/आस्था-९
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१.
दिनांक:- १७ सप्टेंबर,२०१६.

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद. (सर्व)

विषय:- **प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांनी राष्ट्रिय आरोग्य अभियानातील कामकाज करणेबाबत**

उपरोक्त विषयावरील पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, राष्ट्रीय आरोग्य अभियान हा कार्यक्रम सन २००५-०६ पासून राज्यात सुरू झाला. त्यापूर्वी लसीकरण,पल्स पोलिओ व कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया हे कार्यक्रम चालू होते व या कार्यक्रमाचे लेखे तथा इतर कामकाज प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरीय लिपिकवर्गीय कर्मचारी पाहत होते. तदनंतर या कार्यक्रमांचा समावेश राष्ट्रीय आरोग्य अभियानात झाला. मात्र माहे एप्रिल २०१६ पासून काही जिल्हा परिषदांमधील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांनी राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कामे करण्यास नकार दिला आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र हा गाव पातळीवरील रुग्ण सेवा देणारी आरोग्य संस्था असून त्यासाठी या स्तरावर मोठया प्रमाणावर निधी वितरीत केला जातो अर्थातच या निधीचे अभिलेखे ठेवणे बंधनकारक आहे.

२. लिपिकवर्गीय कर्मचा-यांनी विशिष्ट अभियान राबविले जात आहे, म्हणुन त्या अभियानाचे कामकाज नाकारणे गैरशिस्तीचे आहे. त्यामुळे सर्व जिल्हा परिषदांमधील प्राथमिक आरोग्य केंद्र [illegible] लिपिकवर्गीय कर्मचा-यांनी राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे कामकाज पूर्वी प्रमाणेच करण्याबाबत [illegible] सुचना देण्यात याव्यात.

(signature)
(प्रि.शं.कांबळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :- विभागीय आयुक्त (सर्व) यांना माहितीस्तव अग्रेषित.